**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रस्तावावर चर्चेला आज प्रधानमंत्री लोकसभेत उत्तर देणार
- कृषीविषयक योजनांमधे कोणतीही अनियमितता सहन केली जाणार नाही असं केंद्रीय कृषीमंत्र्यांचं स्पष्ट प्रतिपादन
- दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी उद्या मतदान
- कॅनडा आणि मेक्सिको साठी आयातशुल्कातली वाढ एकमहिना लांबणीवर टाकण्याची अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा

**आणि**

- ३८व्या राष्ट्रीय क्रीडास्पर्धांच्या पदकतालिकेत कर्नाटकची अव्वल स्थानी झेप

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रस्तावावर चर्चेला उत्तर देतील अशी माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू यांनी दिली. संध्याकाळी पाच वाजता मोदी चर्चेला उत्तर देणार आहेत. राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दल आभारप्रस्तावावरल्या चर्चेला काल संसदेच्या दोन्ही सभागृहात सुरूवात झाली.

**<><><><><>**

कृषीविषयक योजनांमधे कोणतीही अनियमितता सहन केली जाणार नाही, तसंच प्रधानमंत्री पिक विमा योजनेत जर भ्रष्टाचार झाला असेल तर त्याची चौकशी केली जाईल, आणि दोषींवर कारवाई केली जाईल, असं आश्वासन कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज लोकसभेत दिलं. महाराष्ट्रात पिकविमा योजनेत गेल्या सरकारच्या काळात भ्रष्टाचार झाल्याचं वक्तव्य राज्याचे कृषी मंत्री शिवाजीराव कोकाटे आणि भाजपा आमदार सुरेश धस यांनी केल्याचं खासदार सुप्रिया सुळे यांनी लोकसभेत सांगितलं. याबाबत सुळे यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना चौहान बोलत होते.

**होल्ड - बाईट - चौहान......**

महाराष्ट्र सरकारने पिकविमा योजनेच्या सुधारणेसाठी पावलं उचलली आहेत, असंही चौहान म्हणाले.

पिकविमा योजना ही जगातली सर्वात मोठी विमा योजना आहे, काही राज्यांची त्यांची स्वतःची विमा योजना आहे, असं चौहाना दुसऱ्या एका प्रश्नाला उत्तर देताना म्हणाले. सर्व प्रकारच्या नैसर्गिक संकटामुळे निर्माण होणाऱ्या जखमीपासून संरक्षण करणं हा या योजनेचा हेतू आहे, असं ते म्हणाले.

देशातल्या शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं.

सरकारने २०१९ पासून उत्पादन खर्चावर ५० टक्के नफा गृहित धरून किमान हमीभाव ठरवले आहेत, असं चौहान म्हणाले. नारळ उत्पादनात भारत जगात पहिल्या क्रमांकाचा देश बनल्याचा उल्लेखही यावेळी चौहान यांनी केला.

<><><><><>

२०३१-३२ पर्यंत ऊर्जा निर्मितीची क्षमता ८७४ गिगावॅटपर्यंत वाढवण्याची सरकारची योजना असल्याचं केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांनी राज्यसभेत एका लिखित प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. यात कोळसा, लिग्नाईट यासारख्या पारंपरिक तसंच सौर, पवन आणि जल ऊर्जेसारख्या नवीकरणीय ऊर्जास्त्रोतांचा समावेश असेल असं नाईक म्हणाले. सध्याची ऊर्जा निर्मिती क्षमता ४६२ गिगावॅट असून देशात ऊर्जेची पुरेशी उपलब्धता असल्याचंही त्यांनी सांगितलं. ऊर्जेचा तुटवडा लक्षात घेता सरकारने एप्रिल २०१४ मधे ऊर्जा निर्मितीत २३० गिगावॅट क्षमतेची वाढ केली अशी माहिती नाईक यांनी दिली.

दरम्यान, कुंभमेळ्यात झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणी चर्चा घडवून आणण्याची विरोधी पक्षाची मागमई राज्यसभेचे उपाध्यक्ष हरीवंश यांनी फेटाळून लावली.

<><><><><>

दिल्ली विधानसभा निवडणूक प्रचारादरम्यान निवडणूक आयोगाची जाणूनबूजून बदनामी करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचं निवडणूक आयोगाने म्हटलं आहे. आम आदमी पक्षाच्या नेत्यांनी मुख्य निवडणूक

आयुक्त राजीव कुमार यांच्यावर वारंवार केलेल्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर हे विधान महत्वाचं ठरत आहे. निवडणूक आयोग या आरोपांची दखल न घेता आपलं काम कायद्याच्या चौकटीत राहून अतिशय निःपक्षपातीपणे करतच राहील असं आयोगाने समाजमाध्यमांवर म्हटलं आहे.

दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी उद्या मतदान होणार आहे. यासाठीची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. एक कोटी ५६ लाखाहून अधिक मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. या निवडणुकीत एकूण ६९९ उमेदवार रिंगणात आहेत. शनिवारी आठ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे.

**<><><><><>**

कॅनडा आणि मेक्सिको या शेजारी देशांनी सीमा सुरक्षेच्या प्रयत्नांना बळकटी देण्यावर सहमती दर्शवल्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या देशांसाठी लागू केलेली आयातशुल्क वाढ एक महिना स्थगित केल्याची घोषणा केली आहे. मात्र, चीनसाठी नवी दर आकारणी आजपासून लागू होणार आहे.

ट्रम्प यांच्याशी दूरध्वनीवर झालेल्या संभाषणात आपण सीमा सुरक्षेसाठी अतिरिक्त सहकार्य करू, असं आश्वासन दिल्याचं कॅनडाचे प्रधानमंत्री जस्टिन ट्रूडो यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे. तर मेक्सिकोच्या राष्ट्राध्यक्ष

क्लॉडिया शेनबॉम यांनी अमेरिका-मेक्सिको सीमेवर 10 हजार सैनिक तैनात करायला सहमती दिल्याचं ट्रम्प यांनी यापूर्वी जाहीर केलं होतं.

**<><><><><>**

संयुक्त राष्ट्राच्या वार्षिक खर्चासाठी भारतानं ३ कोटी ७६ लाख ४० हजार अमेरिकन डॉलर्सचं योगदान दिलं आहे. नियमित पणे योगदान देणाऱ्या ३५ देशांमध्ये भारताची गणना होते.संयुक्त राष्ट्रांच्या महासचिवांचे प्रवक्ते स्टीफन दुजारीक यांनी नियमितपणाची प्रशंसा केली आहे.

**<><><><><>**

उत्तराखंडमधे सुरु असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडास्पर्धांमधे कर्नाटकने काल एका दिवसात ७ पदकं मिळवून पदकतालिकेत अव्वल स्थानी झेप घेतली आहे. तर महाराष्ट्राने पदकांची साठी ओलांडत सर्वाधिक पदकं मिळवण्याचा मान कायम राखला आहे. कर्नाटकाला आतापर्यंत २२ सुवर्ण तर प्रत्येकी दहा रौप्य आणि कांस्य पदकं मिळाली सेनादलांचा संघ १९ सुवर्ण, १० रौप्य आणि ९ कांस्य पदकं मिळवून दुसऱ्या स्थानावर आहे.

महाराष्ट्राने १५ सुवर्ण , २६ रौप्य आणि २० कांस्य अशी एकूण ६१ पदकं मिळवली आहेत.

**<><><><><>**

भूतान नरेश जिग्मे खेसर नामग्यल वांगचुक यांनी आज प्रयागराज इथं त्रिवेणी संगमावर पवित्र स्नान केलं. भूतान नरेश आज अक्षयवट आणि बडे हनुमान

मंदिरात दर्शन घेणार असून ते डिजिटल महाकुंभ एक्सपिरिअन्स सेंटरलाही भेट देतील उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही आज संगमावर स्नान केलं.

<><><><><>

महाराष्ट्रात GBS या आजाराच्या प्रादुर्भावाविषयी केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांनी काल दूरस्थ माध्यमातून आढावा बैठक घेतली. संशयित रुग्णांची संख्या वाढत असली तरी हा आजार संसर्गजन्य नाही, त्यामुळे परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात असल्याचं त्यांनी सांगितलं. या आजाराच्या प्रसाराला आळा घालण्यासाठी केंद्रसरकारशी समन्वय राखून काम करावं असं ते म्हणाले. केंद्रसरकार या संदर्भात हरप्रकारे मदत करील असं आश्वासन त्यांनी दिलं. केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ या बैठकीला उपस्थित होते.

दरम्यान, राज्यात आत्तापर्यंत जीबीएस आजाराचे १६३ संशयित रुग्ण आढळून आले आहेत. त्यापैकी १२७ रुग्णांना जीबीएस आजार झाल्याचं तपासातून निश्चित झालं आहे. काल अहिल्यानगर शहरात या आजाराचा एक संशयित रुग्ण आढळून आला असून, त्याला पुढील तपासणीसाठी पुण्याच्या ससून रुग्णालयात पाठवण्यात आलं आहे.

<><><><><>

मुंबई महानगरपालिकेचं २०२५-२६ या वर्षासाठीचं ७४ हजार ४२७ कोटी रुपयांचं अंदाजपत्रक आज सादर झालं. मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्तांनी पालिका मुख्यालयात महापालिका आयुक्त, तसंच राज्य नियुक्त प्रशासक भूषण गगराणी, यांच्यापुढे ते सादर केलं. ७ मार्च २०२२ पासून मुंबई महानगरपालिका प्रशासकाच्या अधिपत्याखाली आहे.

//<><><><><>//